


नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

अहिल्यानगर । अंक १६५ । वर्ष ५० वे । रविवार, ६ जुलै २०२५ । पाने १२ किंमत ₹ ६




# ठाकरे बंधूंकडून राजकीय युतीचे संकेत!

## ■ मराठी एकजुटीचा मेळावा ■ आरपारची लढाई लढण्याची तयारी

**मुंबई (प्रतिनिधी)– हिंदी सक्तीवर मराठी जनांच्या शक्तीने मिळवलेल्या विजयाचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी आयोजित सर्वपक्षीय मेळाव्यावर अपेक्षेप्रमाणे ठाकरे बंधूंचे वर्चस्व दिसून आले. २० वर्षानंतर ठाकरे बंधू मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आले होते. यावेळी उद्धव आणि राज या दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र राजकारणाचे संकेत दिल्याने राजकारण ढवळून निघाले आहे. मराठी माणसाची एकजूट तुटू देऊ नका. कोणतीही तडजोड न करता बाळासाहेबांचे स्वप्न साकार करूया, असे सांगत राज ठाकरे यांनी शिवसेना-मनसे युतीचे संकेत दिले. बऱ्याच वर्षानंतर राज आणि माझी भेट व्यासपीठावर झाली. एकत्र येणार म्हणून आमच्या भाषणाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु आमच्या भाषणापेक्षा आमचे एकत्र दिसणे हे महत्वाचे आहे. आता एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठी असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी शिवसेना आणि मनसेच्या युतीवर जवळपास शिक्कामोर्तब केले.**

## मराठी माणसांची एकजूट कायम ठेवा

### उद्धव ठाकरे : एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठी

**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र हा शूर वीरांचा आहे. आम्ही कुणावर दादागिरी करणार नाही आणि कुणी केली तर ती सहनही करणार नाही. त्यामुळे मराठा-मराठेतर, ब्राम्हण-ब्राम्हणेतर असे सर्व मतभेद बाजूला ठेवून मराठी माणसांची एकजूट ठेवा. तुटू नका, फुटू नका, मराठी ठसा पुसू नका, असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी मराठीप्रेमींना केले. भाजपच्या सात पिढ्या उतरल्या तरी हिंदीची सक्ती होऊ देणार नाही, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी भाजप सरकारला दिला.

मनसे, उद्धव ठाकरे गट तसेच मराठीप्रेमी संघटनांच्या विरोधामुळे



राज्य सरकारला इयत्ता पहिलीपासून हिंदीची सक्ती करणारा निर्णय मागे घ्यावा लागला. या पार्श्वभूमीवर मराठी एकजुटीचा विजयी (पान ६ वर)

## वाकड्या नजरेने पहायचे नाही!

### राज ठाकरे : महाराष्ट्र, मराठी भाषेत तडजोड नाही

**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र, मराठी भाषा आणि मराठी माणूस या विषयात कोणत्याही परिस्थितीत तडजोड होणार नाही. माझ्या मराठीकडे, महाराष्ट्राकडे कुणी वाकड्या नजरेने पहायचे नाही, असा निर्वाणीचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी विजयी मेळाव्यात बोलताना दिला. शांत वाटतो म्हणून आम्ही गांडूची औलाद नाही, असे सुनावताना राज ठाकरे यांनी मराठी भाषेसाठी आरपारची लढाई लढण्याची तयारी असल्याचे संकेत दिले.

उद्धव आणि मी तब्बल २० वर्षांनी एकाच व्यासपीठावर एकत्र आलो आहोत. जे बाळासाहेबांना जमले नाही, अनेकांना जमले नाही, आम्हाला एकत्र आणायला देवेंद्र फडणवीसांना जमले, अशी मार्मिक टिप्पणी राज ठाकरे यांनी सुरुवातीलाच केली. (पान ६ वर)

## सत्ताधाऱ्यांनी उडवली खिल्ली

### ठाकरेंवर भाजप, शिंदे सेनेची टीका

**मुंबई**– ठाकरे बंधूंकडून आयोजित मराठी एकजुटीचा विजयी मेळाव्यावर सत्ताधारी गटाने टीकेची झोड उडवली आहे. विशेषत: भाजपाचे नेते शेलक्या भाषेत टीका करताना दिसले. मराठीबाबत एक शब्द न बोलताना



आमचं सरकार पाडलं, आमचा पक्ष फोडला, हे रडगाणं सुरू केलं. त्यामुळे हा मराठीचा विजय नव्हता. रुदालीचं दर्शन या ठिकाणी झालं, असं प्रत्युत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. तर तीन वर्षांपूर्वी आम्ही उठाव केला, अन्यायाविरोधात आवाज उठवला. तेव्हा दाढीवरून अर्धाच हात फिरवला होता. त्याने ते आडवे झाले, अजून सावरले नाहीत. आता कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे उठेगा नाही वगैरे हे त्यांना शोभून दिसते. काही गोष्टी करण्यासाठी मनगटात जोर लागतो, फक्त तोंडाच्या वाफा दवडून होत नाही, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. (पान ६ वर)

## ● महत्त्वाचे

### शुभमनचे दीडशतक इंग्लंड अडचणीत

**बर्मिंघम** – भारताचा कर्णधार शुभमन गिलने इतिहास रचला आहे. बर्मिंघम क्रिकेट कसोटीत यजमान इंग्लंडविरुध्द शुभमन गिलनं पहिल्या डावात २६९ धावा केल्या तर दुसऱ्या डावात शुभमन गिलनं दीडशतक झळकावले आहे. यामुळं भारत बर्मिंघम कसोटीत मजबूत स्थितीत पोहोचला आहे. भारताने ६ बाद ४२७ धावांवर डाव घोषित केला. भारताने एकूण ६०७ धावांची आघाडी घेते इंग्लंडला विजयासाठी ६०८ धावांचं आव्हान दिलं आहे. दुसऱ्या डावाच्या सुरूवातीलाच इंग्लंडची अवस्था २ बाद ३१ अशी झाली आहे. शुभमन गिलनं १२९ बॉलमध्ये शतक पूर्ण केलं. तो १६१ धावां काढून बाद झाला. एकाच कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सुनील गावसकरांच्या नावावर होता. आता या यादीत शुबमन गिल अव्वल स्थानी पोहोचला आहे.

### मुख्यमंत्रिपदावर सिद्धरामय्या कायम

**बंगळूरू** – कर्नाटकमध्ये सध्या काँग्रेसचं सरकार असून ज्येष्ठ नेते सिद्धरामय्या यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची सूत्रे आहेत. मात्र, मागील काही दिवसांपासून सिद्धरामय्या व उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यातील सत्तासंघर्ष चव्हाट्यावर आला आहे. मुख्यमंत्रिपद हे त्यामागचं कारण असल्याचं सांगितलं जात आहे. २०२३ मध्ये कर्नाटकमध्ये पुन्हा काँग्रेसने सत्तास्थापन केल्यानंतर सिद्धरामय्या व डी. के. शिवकुमार यांच्याकडे अडीच-अडीच वर्ष मुख्यमंत्रिपद राहील, असं सांगितलं जात होतं. मात्र, आता कर्नाटकातील राजकीय चित्र पूर्णपणे पालटलं असून सिद्धरामय्या हेच मुख्यमंत्री राहणार असल्याचं निश्चित झालं आहे.

### सुशील केडियांना अखेर उपरती

**मुंबई** – मराठी बोलणार नाही, काय करायचे ते करून घ्या, असे वक्तव्य करत महाराष्ट्रामध्ये वादाची ठिणगी टाकणारे मुंबईतील गुंतवणूकदार सुशील केडिया यांनी अखेर माफी मागितली आहे. केडिया यांचे कार्यालय मनसे सैनिकांनी शनिवारी सकाळीच फोडले होते. त्यानंतर सुशील केडिया यांना उपरती सुचली असून त्यांनी माफी मागीतली आहे. या संदर्भात केडिया म्हणाले, मला माफ करा, माझे वक्तव्य मी मागे घेतो. मात्र राज्यातील खराब झालेले वातावरण ज्यांना शक्य असेल त्यांनी नीट करा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ४० दिवसांच्या बालिकेची साडेतीन लाखांत विक्री

### ▌आई-वडिलांसह सहा अटकेत ▌संगमनेरातील महिलेचा समावेश

**पुणे (प्रतिनिधी)– पैशांसाठी आई वडिलांनी स्वत:च्या ४० दिवसांच्या बालिकेची साडेतीन लाख रुपयांत विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला आहे. मुलीस विकल्याची बाब उघड झाल्यावर याप्रकरणी येरवडा पोलिसांनी आई-वडिलांसह सहा जणांना अटक केली आहे. त्यात संगमनेर येथील एका महिलेचा समावेश आहे.**



मीनल ओंकार सपकाळ (वय ३०, रा. बिबवेवाडी,पुणे) ओंकार औदुंबर सपकाळ (वय २९, रा. बिबवेवाडी,पुणे), साहिल अफजल बागवान (वय २७, रा. सातारा), रेश्मा शंकर पानसरे (वय ३४, रा. येरवडा,पुणे), सचिन रामा औंहताडे (वय ४४, रा. येरवड,पुणे), दीपाली विकास फटांगरे (वय ३२, रा. संगमनेर) अशी अटक (पान ६ वर)

## पुनतगावफाट्याजवळ अपघातात दोघांचा मृत्यू

### एकजण जखमी; तिघेही पुनतगावचे रहिवासी

**पाचेगाव फाटा (वार्ताहर)**– मोटारसायकल घसरुन रस्त्यावर पडली. या मोटारसायकवरुन कार गेल्याने मोटारसायकलवरील दोघे चिरडून मृत्यूमुखी पडले तर दूरवर फेकला गेलेला एकजण जखमी झाला. ही घटना नेवासा तालुक्यातील पुनतगाव फाट्याजवळ घडली. मृत पावलेले दोघेही पुनतगाव येथील रहिवासी होते.

शनिवार दि. ५ जून रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास विक्रम भीमा आढाव (रा. शिरजगाव ता. येवला जि. नाशिक) हे आपल्या दोन



अमोल दारकुंडे



निवृत्ती पवार





मित्रांसमवेत मित्राच्या मारुती रिट्स कारने भालगाव तालुका नेवासा येथे स्वत:करिता सेकंडहॅण्ड कार पाहण्यासाठी श्रीरामपूरकडून नेवाशाकडे येत होते. पुनतगाव फाट्याच्या जवळ नेवाशाकडून एका मोटारसायकलवर तिघेजण येत असताना मोटारसायकल घसरून पडल्याने ती कारखाली आली. दोघेजण कारखाली चिरडले गेले व पाठीमागे बसलेला तिसरा बाजूला फेकला गेला. कार चालकाने कार थांबवून पाहिले असता दोघेजण गंभीर जखमी झालेले होते. कार चालक विक्रम भीमा आढाव हा आपल्या दोन्ही मित्रांसह रस्त्याने जाणाऱ्या दुसऱ्या वाहनाला थांबवून पोलीस ठाण्यात (पान ६ वर)

## कोणी युरिया देता का...युरिया!

### लिकींगमुळे बळीराजाच्या खिशावर डल्ला; भरपूर स्टॉक असल्याचा कृषी यंत्रणेचा दावा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– यंदा उन्हाळ्याच्या शेवटी धोधो पाऊस बरसला. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी जून महिन्यांच्या सुरूवातीलाच पेरणी केली. आता महिना झाला नुसतं भिरभिरणारे वारे आणि शॉवर सारखा पाऊस यामुळे पिके तहानली आहेत. त्यातच शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या युरिया खतांचा तुटवडा झाला असून युरियासाठी शेतकऱ्यांची धावधाव सुरू आहे. युरिया मिळत नसल्याने शेतकरी बेजार



असतांना ज्या ठिकाणी युरिया उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी कृषी केंद्र चालकांकडून लिकींग करण्यात येत असल्याने बळीराजाची आर्थिक परवड सुरू आहे. यामुळे कृषी विभागाने तातडीने युरियाचा काळाबाजारसह लिकींग करणाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे. (पान ६ वर)

## सव्वा लाख पालकांचा मिशन आरंभमध्ये सहभाग

### साडेतीन हजार शाळांमध्ये मेळावा यशस्वी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये राबवण्यात येणाऱ्या मिशन आरंभमध्ये जिल्ह्यातील १ लाख १४ हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत. आता या मिशनमध्ये संबंधीत विद्यार्थ्यांचे पालक देखील सहभागी होवून आपल्या पाल्याच्या गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. यासाठी शनिवारी जिल्ह्यातील ३ हजार ५३४ शाळांमध्ये पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी पालकांनी



विद्यार्थ्यांच्या मिशन आरंभच्या तिसऱ्या सराव परीक्षेच्या उत्तरपत्रिकांवर चर्चा करत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीत योगदान देण्याचे निश्चिय केला आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील जास्ती विद्यार्थ्यांची (पान ६ वर)

## स्पर्श न करता एआयच्या मदतीने शोधणार स्तनाचा कर्करोग

### केईएम रुग्णालय उपचारांचा प्रभाव तपासणार

**मुंबई** – केईएम रुग्णालयात स्पर्श न करता एआयच्या मदतीने महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाचे निदान करण्यात येणार आहे. एआयच्या मदतीने एका वर्षात ७ हजार महिलांची तपासणी केली जाईल आणि मशीनच्या परिणामाचा देखील अभ्यास केला जाईल. केईएम रुग्णालयातील डॉक्टर एआय स्तनाच्या कर्करोगाच्या उपचारात ते किती प्रभावी आहे याचा अभ्यास करत आहेत. हा अभ्यास सुमारे एक हजार महिलांवर केला



जाईल.

कर्करोगविभागाच्याप्राध्यापक आणि स्तनाच्या कर्करोग सेवेच्या प्रमुख डॉ. शिल्पा राव म्हणाल्या, या मशीनच्या मदतीने एका वर्षात ७ हजार महिलांची तपासणी केली जाईल. (पान ६ वर)

## साखर कामगार वेतन वाढ त्रिपक्ष समितीला पुन्हा मुदतवाढ

### पवारांच्या लवादाच्या निर्णयावर राज्य सरकार शिक्कामोर्तब करणार?

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील साखर उद्योग व जोडधंद्यातील कामगारांना वेतन वाढ व इतर सेवाशर्ती लागू करण्यासाठी डिसेंबर २०२४ मध्ये त्रिपक्ष समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने सहा महिन्यांत वेतनवाढीचा निर्णय घेणे अपेक्षित होते. या कालावधीत समितीच्या चार बैठका झाल्या, परंतू ठोस निर्णय न झाल्याने साखर कामगारांनी नाराजी व्यक्त केली आहे. आता हा विषय ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या लवादासमोर जाणार असून त्यांनी घेतलेला निर्णय सरकार मान्य करणार का? असा सवाल साखर कारखाना कामगारांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, अभ्यासाचा कालवधी संपल्याने या समितीला पुन्हा ३ महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. समितीच्या मागील (पान ६ वर)

## भंडारदरा ७० तर निळवंडे ६४ टक्के भरले

### प्रवरा नदीत विसर्गात वाढ

**भंडारदरा (वार्ताहर)** – सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पुन्हा एकदा पावसाला जोर चढल्याने धरणांत येणाऱ्या नवीन पाण्याने पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ होत आहे. यामुळे भंडारदरा धरणाचा पाणीसाठा शनिवारी सायंकाळी ६ वाजता ७७५२ दलघफू (७०.२२ टक्के) तर निळवंडेचा ५३५३ दलघफू (६४.२८ टक्के) झाला आहे. पावसाचा जोर असल्याने पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी जलसंपदा विभागाने ६८६३ क्युसेकने प्रवरा नदीपात्रात विसर्ग सोडला आहे. (पान ६ वर)



**२४ तासांत पडलेला पाऊस** (आकडे मिमीमध्ये)

| भंडारदरा | घाटघर | रतनवाडी | निळवंडे | पांजरे | वाकी | आढळा | अकोले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७० | १४८ | १६६ | १५ | ८६ | ६८ | ०१ | ११ |

### मुळा धरणात १५ हजार २९१ दशलक्ष घनफूट पाणीसाठा

**राहुरी (प्रतिनिधी)**– मुळा धरणात शनिवार ५ जून रोजी सकाळी आवक ४ हजार ४२९ क्युसेस व पाणीसाठा १५ हजार १६ दशलक्ष घनफूट झाला होता. परंतु काल दिवसभरात पाणलोट क्षेत्रातून धरणाकडे आवक वाढली. सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ती ८ हजार ७६९ क्युसेस झाली व पाणीसाठा १५ हजार २९१ दलघफू झाला आहे. धरणात गेल्या २४ तासात ५८७ दलघफू व आतापर्यंत एकूण ६ हजार ३८५ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली आहे. मुळा धरणाचा पाणीसाठा जवळपास ५६.५५ टक्क्यावर पोहचला आहे.

## दारणा, गंगापूर पाणलोटात पावसाचा जोर, भाम भरले



**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर दारणा, गंगापूर धरणाच्या पाणलोटात काल जोरदार पाऊस झाला. त्यामुळे धरणातील विसर्ग काही प्रमाणात वाढविण्यात आले आहे. भावली पाठोपाठ भाम धरणही काल १०० टक्के भरले. खाली जायकवाडी जलाशयात उपयुक्त साठा ५० टक्के होण्याच्या मार्गावर आहे.

काल दारणा धरणाच्या पाणलोटातील इगतपुरी, (पान ६ वर)